ARTHA. Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादी विषयांस वाहिलेले प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारी प्रसिद्ध होते.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणे ४

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 80. Licence No. 175

वर्ष ३२ | पुणे, बुधवार १७ ऑगस्ट, १९६६ | अंक १६




## बँक ऑफ महाराष्ट्र

लिमिटेड

MB

आपल्या १०० हून अधिक शाखाद्वारे आपली सर्व तऱ्हेची सेवा करण्यांस तत्पर आहे.

रजिस्टर्ड ऑफिसः ११७७ बुधवार पेठ, पुणे-२.

## वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९४५ ] | ७, मुगभाट रस्ता, मुंबई-४. | [ टेलिफोन ३५६५०२

( १ ) बचत खाते :—व्याजाचा दर : द. सा. द. शे. रु. ४=००

( २ ) महाराष्ट्र राज्यातील प्रमुख गावांवर डिमांड ड्राफ्ट उपलब्ध

( ३ ) खास बचत योजना :—घरी बसून खात्यात पैसे भरता येतात.

अधिक तपशिलासाठी लिहा अथवा भेटा.

मॅनेजर—ना. शं. कानिटकर

## केरळमधील कर्जबाजारी संसार

१९६१ च्या शिरगणतीच्या वेळी केरळमधील खेड्यांतील कुटुंबांच्या अंदाजपत्रकांची पाहणी करण्यात आली. त्यावरून असे दिसून आले की केरळ राज्यातील ग्रामीण भागात राहणाऱ्या कुटुंबांपैकी ४५·३५ टक्के कुटुंबांना कमी–अधिक प्रमाणात कर्जाचा भार सहन करावा लागत होता. प्रत्येक कुटुंबाला सरासरी ५०३ रुपयांचे कर्ज असल्याचे पाहणीत दिसून आले. ह्या पाहणीत जमा करण्यात आलेली इतर माहितीही उद्‌बोधक आहे. केरळ राज्यातील दरडोई वार्षिक उत्पन्न सुमारे २८४ रुपये आहे. दरडोई खर्चाचे प्रमाण २२९ रुपये आहे. पाहणीत समाविष्ट करण्यात आलेल्या कुटुंबांपैकी ११·८९ टक्के कुटुंबे आपल्या कौटुंबिक जमाखर्चाची तोंडमिळवणी करू शकतात आणि ३६·८६ टक्के कुटुंबांच्या जमाखर्चाची तोंडमिळवणी होऊ शकत नाही. कौटुंबिक अंदाजपत्रकांची तपशीलवार पाहणी करण्यात आली असता असे दिसून आले की ६० टक्के कुटुंबांना दिवसात तीन वेळा खाण्यास मिळते; २५ टक्के कुटुंबांना तीन वेळांपेक्षा अधिक वेळा अन्न मिळते आणि १४ टक्के कुटुंबांना फक्त दोनदाच भोजन मिळते. १९७१ च्या सुमारास केरळमधील लोकसंख्या २०७·३४ लाख इतकी होईल असा अंदाज करण्यात आला आहे. त्यात पुरुषांची संख्या १०१·४९ लाख आणि स्त्रियांची संख्या १०५·८५ लाख असेल. ह्या वाढत्या लोकसंख्येमुळे राज्यातील अन्नाचा आणि रोजगारीचा प्रश्न अधिकच तीव्र स्वरूप धारण करणार आहे. त्याचप्रमाणे अर्धबेकारांचा प्रश्नही विकट होणार आहे. राज्यातील रोजगारीचा प्रश्न सोडविण्यासाठी उद्योगधंद्यांचा, शेतीचा व मच्छीमारीचा विकास त्वरित घडवून आणावा लागेल. गेल्या दहा वर्षांत राज्यातील लोकांची परिस्थिती थोडीबहुत सुधारलेली आहे.

## धूम्रपानाला आळा घालण्यासाठी आर्थिक उपाय

धूम्रपानाच्या संवयीच्या बाबतीत पोलंड ह्या देशाचा अनुक्रम युरोपातील देशांत तिसरा लागतो. त्या देशाच्या कम्युनिस्ट सरकारला ह्या संवयीला आळा घालावयाचा आहे. म्हणून सिगारेटस् आणि तंबाखू ह्यांच्या किंमती वाढविण्याचा निर्णय सरकारने नुकताच घेतला आहे. पोलंडमध्ये धूम्रपानाची संवय झपाट्याने पसरू लागल्यामुळे तेथील सरकारला किंमती वाढवाव्या लागल्या, असे सरकारनेच वृत्तपत्रांत जाहीर केले आहे. सार्वजनिक आरोग्याच्या बाबतीत पोलंडमध्ये जे संशोधन करण्यात आले आहे त्यावरून लोकांच्या आरोग्यावर धूम्रपानाचा फार वाईट परिणाम होतो असे आढळून आले आहे. काही वस्तूंच्या किंमती मात्र उतरविण्यात आल्या आहेत. काही प्रकारचे मासे, टेलिव्हिजनचे पडदे आणि शीतपेट्या ह्यांच्या किमती कमी करण्यात आल्या आहेत.

## हैड्रोजन बाँब शोधण्यासाठी नुकसानभरपाई

गेल्या जानेवारी महिन्यात स्पेनच्या आग्नेय किनाऱ्याजवळ एका अमेरिकन बाँबफेक्या विमानाची व हवेतच इंधन पुरविणाऱ्या विमानाची टक्कर होऊन एक हैड्रोजन बाँब भूमध्य समुद्रात पडला होता. छत्रीच्या आधाराने खाली येऊन पाण्यात पडलेल्या ह्या बाँबची जागा एका कोळयाने दाखविली. त्याप्रमाणे शोध करण्यात येऊन गेल्या एप्रिल महिन्यात बाँब परत मिळविण्यात आला. ह्या कामात भाग घेतलेल्या कोळयाला अमेरिकेने ६,००० डॉलर्सची रक्कम नुकसानभरपाईदाखल दिलेली आहे. शोध करण्याचे काम चालू असताना त्याला आपला कामधंदा अर्थातच बंद ठेवावा लागला होता. तथापि ६ हजार डॉलर्सच्या रकमेने ह्या स्पॅनिश नागरिकाचे समाधान झालेले नाही. त्याच्या मताने ५० लाख डॉलर्स नुकसानभरपाई मिळावयास पाहिजे. इतकी रक्कम मिळण्यासाठी त्याने अमेरिकेच्या परदेशीय नुकसानभरपाई समितीकडे अर्ज केला आहे.

## दातांच्या आरोग्यवर्धनाची मोफत केंद्रे

चौथ्या पंचवार्षिक योजनेत शाळकरी मुलांच्या आरोग्यासाठी जारी करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांत विद्यार्थ्यांच्या दातांच्या आरोग्याची जपणूक करणारी ५०० मोफत केंद्रे स्थापन करण्यात येणार आहेत. भारत सरकार कार्यक्रमासाठी १·५५ कोटी रुपये मंजूर करण्याची शक्यता आहे. ह्यांपैकी ५५ लाखांचा खर्च पुन्हा पुन्हा येणारा असून बाकीचा एकदाच करावा लागणार आहे. दातांचे आरोग्य राखण्यासाठी २५० ते ३०० निरनिराळ्या गोष्टींची आवश्यकता असते. त्यांपैकी ६७ वस्तू मद्रासमध्ये रशियाच्या साहाय्याने उघडण्यात आलेल्या वैद्यकीय उपकरणांच्या कारखान्यात तयार होऊ लागल्या आहेत. मुंबईतील एका खाजगी कारखान्याकडे दंतवैद्यांना लागणाऱ्या १२० खुर्च्या बनविण्याचे काम सोपविण्यात आले आहे. सध्या ह्या खुर्च्या परदेशातून आयात कराव्या लागतात.


॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणे २.

चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ॥ —श्रीज्ञानेश्वरी

★ भारतीय स्वातंत्र्याचा विजय असो ★

स्वातंत्र्यदिनाच्या मंगल प्रसंगी आमच्या सर्व भागीदार,
ठेवीदार व हितचिंतकांना अभिवादन व हार्दिक शुभेच्छा !

गो. श्री. वाळिंबे,
बी. कॉम.,
मॅनेजर.

शं. ल. लिमये,
बी. एससी., एलएल. बी.,
अध्यक्ष.

# अर्थ

बुधवार, १७ ऑगस्ट, १९६६



संस्थापक : प्रा. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


### विकसनशील देशांनी पाळावयाचा पथ्याची दिशा

आंतरराष्ट्रीय व्यापारी व्यवहारातील पैशाच्या देण्याघेण्या संबंधीचे तज्ज्ञ पर जेकबसन हे १९६३ मध्ये मृत्यु पावले. त्यांच्या स्मरणार्थ अमेरिकेत संस्था स्थापन करण्यात आली आहे. ह्या संस्थेच्या विद्यमाने १९६५ च्या ऑक्टोबर महिन्यात भारताचे माजी अर्थमंत्री व रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्री. सी. डी. देशमुख ह्यांचे भाषण झाले. विकसनशील अर्थव्यवस्थेत द्रव्य-विषयक धोरण आणि इतर आर्थिक साधने ह्यांच्या वापरात समतोल कसा राखावा ह्याविषयी त्यांनी पुढील आशयाचे विचार व्यक्त केले. अर्थव्यवस्थेचा विकास साधण्याचा प्रयत्न करणाऱ्या देशांना दोन्ही प्रकारच्या उपायांचा एकाच वेळी वापर करावा लागतो आणि गरजेप्रमाणे त्यांच्या वापराच्या पद्धतीत बदल करावा लागतो. तथापि उपायांचे हे प्रकार एकमेकापासून अगदी भिन्न असे दाखविता येणार नाहीत. विकास साधण्याच्या उपायात कोणते अधिक प्रभावी हे सिद्धान्तासारखे सांगता येणार नाही. ह्या बाबतीत प्रत्येक देशाचा मामला वेगळाच असतो. तथापि, असे म्हणता येईल की, पर्यायी धोरणे स्वीकारण्याच्या बाबतीत कारभाराची कार्यक्षमता, अर्थव्यवस्थेमधील संघटित संस्था आणि राजकीय शहाणपणा ह्यांच्यावर बरेच अवलंबून असते. एका अर्थाने असे म्हणता येईल की हा विषय आर्थिक मुत्सद्दीपणाच्या कक्षेतच अधिक येतो. आर्थिक विचारवंतांचे विचार अगर मध्यवर्ती बँकरचा फतवा ह्यांच्या पलीकडचा असा हा विषय आहे. पण, आर्थिक मुत्सद्देगिरी ही चीज विकसनशील देशात फारच दुष्प्राप्य आहे. सध्या ह्या देशांतून उतावळेपणा, सत्तेच्या झगझगाटीचे आकर्षण आणि बेताल अंदाज ह्यांची चलती आहे. अशा अडचणींची किंमत अर्थातच द्यावी लागणार आहे.

---

### तागाच्या वस्तूंच्या उत्पादनात पाकिस्तानची स्पर्धा

पाकिस्तान आणि भारत ह्यांच्यामधील वैर आर्थिक क्षेत्रातही जाणवण्याची लक्षणे दिसू लागली आहेत. पाकिस्तानात जगातील कोणत्याही देशापेक्षा अधिक तागाचे उत्पादन होते. त्यापासून तयार करण्यात येणाऱ्या गोणपाटासारख्या वस्तू उत्पादन करणाऱ्या गिरण्या मात्र पाकिस्तानात पुरेशा प्रमाणात नाहीत. तागाच्या वस्तू उत्पादन करण्यात भारत पुढारलेला आहे. आता मात्र पाकिस्तानने तागाच्या गिरण्यांत अधिक माग बसविण्याचे ठरविले आहे. १९६४ मध्ये पाकिस्तानातील गिरण्यांत ११,३०० माग होते. त्यांची संख्या १९७१ पर्यंत ३० हजारांपर्यंत वाढविण्यात येणार आहे. सध्या पाकिस्तानातील तागाच्या चालू गिरण्यांची संख्या १७ आहे. येत्या ५ वर्षांच्या अवधीत त्यात आणखी ७ ते ९ गिरण्यांची भर पडण्याची शक्यता आहे. पाकिस्तानात १९६५ मध्ये ३ लाख टन वजनाच्या तागाच्या वस्तू तयार करण्यात आल्या. १९६४ मध्ये उत्पादन २० हजार टनांनी कमी होते. ब्रिटनमधील हिंदी बनावटीच्या तागाच्या कापडाच्या किमती झपाट्याने वाढत चालल्या आहेत. किमती रोखण्यात आल्या नाहीत तर भारताची ही बाजारपेठ धोक्यात येईल आणि तिचा फायदा पाकिस्तानला मिळू शकेल. तागाच्या कापडाच्या किमतीत वाढ झाल्यामुळे ब्रिटनमध्ये गोणपाटाच्या पिशव्यांच्या ऐवजी इतर स्वस्त पिशव्या वापरण्यात येऊ लागल्या आहेत. पदार्थ ठेवण्यासाठी कागदाच्या पिशव्या, जाळी आणि पॉलिथीनच्या पिशव्या ह्यांचा वापर वाढत्या प्रमाणावर होऊ लागला आहे. जनावरांचे खाद्यपदार्थ आणि बटाटे ठेवण्यासाठी कागदी पिशव्या वापरण्यात येत आहेत. भाजीपाला ठेवण्यासाठी सुताच्या जाळ्या आणि खतासाठी पॉलिथीनच्या थैल्या वापरण्यात येत आहेत. परिणामी, तागाच्या कापडाची व पिशव्यांची मागणी रोडावली आहे.

---

### शास्त्रीय ज्ञानाच्या बाबतीत स्वावलंबनाची आवश्यकता

इंडिअन इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलजी ह्या संस्थेच्या तिसऱ्या वार्षिक सभेत बोलताना डॉ. सी. व्ही. रमण ह्यांनी तंत्र-विज्ञानाच्या प्रगतीविषयी मोलाचे विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणाले की तंत्रविज्ञानाचा बळकट पाया शास्त्रीय ज्ञानाच्या उपासनेने घालण्यात आला पाहिजे. केवळ तंत्रविज्ञानावर विसंबून आणि शास्त्रीय ज्ञानाची उपेक्षा करून नफा मिळवत राहता येईल अशी हिंदी उद्योगपतींची कल्पना असेल तर ती त्यांची फार मोठी चूक आहे. पदार्थविज्ञान, वीज, रसायन, धातुशास्त्र अशा विविध आधुनिक ज्ञानशाखांत भारताने स्वतःच्या जोरदार विचारपरंपरा निर्माण करणे अतिशय आवश्यक आहे. ह्या नव्या ज्ञान शाखांचे मूलभूत ज्ञान ज्या वेळी देशात विकास पावेल त्याच वेळी तंत्रविज्ञान शिकविणारी तोलदार माणसे पैदा होऊ शकतील. मूलभूत ज्ञानाचा पाया घातला गेल्याशिवाय कोणत्याही देशाला औद्योगिक माहात्म्य प्राप्त करता येत नाही, व येणारही नाही. तंत्रविज्ञानाच्या विद्यार्थ्यांनी निर्भय वृत्ती अंगी बाणवून स्वतंत्र विचारांची कास धरली पाहिजे. ह्या गुणांच्या अभावी भारताच्या प्रगतीत अडथळे उत्पन्न होत आहेत. हिंदी माणसांना शेकडो वर्षांच्या परकीय अमलामुळे उसनवारी करण्याची संवय जडलेली आहे. ही वारी पैशापुरतीच मर्यादित नसून ज्ञान आणि तज्ज्ञ ह्यांच्याही बाबतीत करण्यात येत आहे. ही सवय समूळ उखडून टाकणे आवश्यक आहे. भारताने स्वतःच्या पायावर उभे राहण्यास आणि स्वतःच तयार केलेली यांत्रिक साधने वापरण्यास शिकले पाहिजे. युरोप आणि अमेरिका ह्यांच्या तंत्रज्ञानावर भारत अजूनही अवलंबून आहे. असे का असावे ? पाश्चिमात्य देशांपासून भारत अनेक वाईट गोष्टी मात्र शिकला आहे. त्या सर्व विसरून जाण्याचे जारीचे प्रयत्न करण्यात आले पाहिजेत. असे झाले तरच देशाचा भविष्यकाल उज्ज्वल होऊ शकेल.

---

**पोरक्या मुलांची सोय**—पोरक्या मुलांना आपल्या कुटुंबात घेऊन त्यांचे पालनपोषण करण्यास तयार असणाऱ्या दांपत्यांना उत्तेजन देण्याचे गुजरात सरकारने ठरविले आहे. ही कामगिरी करण्यास तयार असणाऱ्याला प्रत्येक अनाथ मुलामागे दरमहा ४५ रुपये देण्यात येणार आहेत. सध्या गुजरातमधील समाज-कल्याण संस्थांतून अशा १,५०० मुलांची सोय करण्यात आली आहे. पण त्यांना कौटुंबिक जीवनाची फार गरज आहे.

**राजस्थानात सिमेंटचे कारखाने**—राजस्थानात सिमेंटचे कारखाने काढण्यासाठी आणखी तीन परवाने देण्यात आले आहेत. नवीन कारखाने काढण्यात आल्यावर राजस्थान सिमेंटचे उत्पादन करणारे एक मोठे राज्य होईल. सिमेंटच्या कारखान्यासाठी लागणारा चुनखडीचा दगड व जिप्सम राजस्थानात विपुलतेने सापडतो. चुनखडीचा दगडाचा साठा सुमारे १५० कोटी टन असावा.

**धार्मिक वास्तूंचा विध्वंस**—गेल्या वर्षी भारत व पाकिस्तान ह्यांच्या दरम्यान झालेल्या संघर्षात पाकिस्तानने काश्मीरमधील छांब विभागावर हल्ला केला होता. ह्या भागात असणाऱ्या गुरुद्वारांचा व देवळांचा पाकिस्तानच्या लष्कराने मोठ्या प्रमाणावर विध्वंस केला होता. ह्याबाबतची पाहणी आता पूर्ण झाली असून १०० देवळांची व गुरुद्वारांची मोडतोड केल्याचे आढळून आले आहे.

**सोमवारच्या उपासाची वासलात**—भारतामधील अन्नटंचाई कमी करण्यासाठी म्हणून दर सोमवारी एका वेळी अन्नग्रहण न करण्याच्या व्रताची शिफारस दिवंगत पंतप्रधान शास्त्री ह्यांनी केली होती. ह्या व्रताची आता वासलात लागलेली दिसते. कुरुक्षेत्र विद्यापीठाच्या उपकुलगुरूंना देण्यात आलेल्या मेजवानीत १०० पाहुणे होते. वार सोमवार होता आणि गव्हाचे व तांदळाचे पदार्थ वाढण्यात आले. सोनपत येथे घडलेल्या ह्या प्रसंगी स्थानिक काँग्रेसवाल्यांनीच पुढाकार घेतला होता.

**तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमातील निर्यात**—तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमात भारताने ३,८१२ कोटी रुपयांचा माल निर्यात केला. निर्यातीची वार्षिक सरासरी ७६२ कोटी रुपये पडते. पहिल्या दोन पंचवार्षिक कार्यक्रमांशी तुलना करता तिसऱ्या कार्यक्रमात निर्यातीत दरसाल १६२ कोटींची वाढ झाली असे दिसून येते.


**खताच्या कारखान्यांची उभारणी**—भारतात उभारण्यात यावयाच्या खतांच्या कारखान्यांची तांत्रिक तपासणी-पाहणी करण्यासाठी इंटरनॅशनल फायनॅन्स कॉर्पोरेशनचे प्रतिनिधी मंडळ भारतात आले आहे. ह्यापैकी एक कारखाना कोथगुडम् येथे उभारण्यात यावयाचा आहे. कारखान्यासाठी २२ कोटी रुपये खर्च येईल. जागतिक बँकेकडून १·६ कोटी डॉलर्सचे कर्ज मिळविण्याची खटपट चालू आहे.

**गॅसच्या किंमतीत कपात**—गेल्या काही वर्षांत मोठ्या शहरांतून घरगुती वापरासाठी गॅसचा उपयोग वाढत चालला आहे. सध्या तीन खाजगी कंपन्या व इंडिअन ऑइल कॉर्पोरेशन ह्यांच्यामार्फत ग्राहकांना गॅसच्या इंधनाचा पुरवठा केला जातो. त्यापैकी बर्माशेल कंपनीने आपल्या टाकीची किंमत २·६९ रुपयांनी, एसो कंपनीने २·४३ रुपयांनी आणि काल्टेक्स कंपनीने २ रुपयांनी कमी केली आहे. इंडिअन ऑइल कॉर्पोरेशनने आपल्या टाकीची किंमत १·३२ रुपयांनी कमी केली आहे.




धूर म्हणजेच संकटाला आमंत्रण...

परंतु किर्लोस्कर डिझेल एंजिन वापरण्यानें धूरही होत नाही व संकटेही उपस्थित होत नाहींत...



बहुधा, प्रत्येक दोन शेतकऱ्यांमागे एकतरी किर्लोस्कर डिझेल एंजिनचा मालक असतो.

शेतकरी व बागाइतदार यांना भरपूर पैसा मिळविण्यास मदत करणारी, असा लौकिक या अति उत्कृष्ट अशा किर्लोस्कर डिझेल एंजिनांच्या कार्यक्षमतेमुळें संपादन केला आहे.

बिनत्रासाची व अखंड कार्यक्षमता आपल्या उत्पादनांत अधिक भर घालील. शिवाय ती ठिकठिकाणी सहजरित्या हलवितां येतात, इतकेच नव्हे तर त्यांतील यांत्रिक सुटे भाग बदलण्यास आपल्याला कुणावरही अवलंबून राहाण्याची गरज पडत नाहीं. विक्रीनंतरची सेवा व सुटे भाग मिळण्याची हमी दिली आहे. ही निराळीच.

किर्लोस्कर

डिझेल एंजिन्स

३ ते १५ हॉर्स पॉवर

किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लिमिटेड,

एल्फिन्स्टन रोड, पुणें-३ (भारत)

TOM & BAY KO: 667-A MAR



सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.

मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोयी.

* टिळक जन्म-शताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

फोन नं. :-३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [ तार-सरदारगृह

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

## सरकारला फसवून परदेशी चलन मिळविण्याचा प्रयत्न !

### बाप-लेकावर खटला

'कच्ची व कमावलेली कातडी' ह्या नावाखाली कचरा एडनमधून आयात करावयाचा आणि त्याची किंमत म्हणून रकमा एडनला पाठवायाच्या, असा धंदा करणाऱ्यांवर सेंट्रल ब्यूरो ऑफ इनव्हेस्टिगेशनने मुंबईच्या प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटच्या कोर्टात खटला भरला आहे. बाप एडनहून हा माल निर्गत करायचा, त्याची किंमत भरमसाट लावायचा आणि मुलगा ती रक्कम मुंबईहून एडनला धाडायचा. अशा रीतीने सौदे अरेबियात हे बाप-लेक परदेशी हुंडणावळ साठवायचे. बाबूभाई पटेलने (मुलगा) लेदर एक्सपोर्ट प्रमोशन स्कीमखाली मद्रासच्या तीन फर्म्सना खोटेपणा करून कातडी व रसायन यांचे आयात परवाने मिळवून दिले होते. ह्या फर्म्सनी त्या परवान्याप्रमाणे फक्त रसायने आयात केली; त्यांच्या संमतीशिवाय त्यांच्या परवान्यावर बाबूभाईने कचरा आयात केला. हा माल आल्यावर कंपन्यांनी तो सोडवून घेण्यास नकार दिला. तेव्हा कस्टम अधिकाऱ्यांनी खोकी फोडली, त्यातून हे प्रकरण उघडकीस आले. सी. बी. आय. अधिकाऱ्यांनी आरोपीच्या दुकानाची आणि पेडर रोडवरील त्याच्या घराची झडती घेऊन बरेच कागदपत्र जप्त केले.

---

### अवमूल्यनामुळे त्रास होणारच

जेरुसलेम येथील एका विद्यापीठातील अर्थशास्त्र व समाजशास्त्र ह्या विभागांच्या प्रमुखाने असे मत व्यक्त केले आहे; की चलनाचे अवमूल्यन झाले, की चालू परिस्थिती तशीच कधीही राहात नाही. अर्थव्यवस्थेतील साधनसामग्रीची फेरवाटणी करणे हा अवमूल्यन करण्याचा हेतू असतो. अर्थातच कोणाला तरी त्याची झळ लागणे अपरिहार्यच आहे. १९४८ सालापासून इस्राइल देशाने कितीदा तरी आपल्या देशाचे अवमूल्यन केलेले आहे. इस्राइलच्या अर्थव्यवस्थेत चलनवृद्धीचे दडपण वाढल्यामुळे अवमूल्यन करण्याची पाळी आली. १९६२ मध्ये इस्राइल सरकारने पुनः अवमूल्यन केले आहे. परंतु त्यामुळे योग्य तो परिणाम झालेला नाही. निर्यातीला आर्थिक मदत देण्याचा प्रश्न पुन्हा नव्याने उभा ठाकला आहे.

---

### मुक्त व्यापार विभागातून निर्यातीला प्रारंभ

१९६५ च्या मार्च महिन्यात कांडला येथील मुक्त व्यापार विभागाचे काम रीतसर चालू करण्यात आले. निर्यातीची वाढ व्हावी आणि बंदराच्या अंतर्भागाचा औद्योगिक विकास व्हावा ह्या हेतूने कांडला मुक्त व्यापार विभाग स्थापन करण्यात आलेला आहे. ह्या विभागात कारखाने स्थापन करण्याच्या कामी हळूहळू प्रगती होत आहे. कांडला बंदरातून नुकताच काही माल आफ्रिकेतील बंदरांना निर्यात करण्यात आला. कांडला बंदरातून लवकरच मालवाहू आणि उतारू बोटींची वाहतूक सुरू होईल. कांडला मुक्त व्यापार विभाग स्थापन झाल्यापासून २ वर्षांच्या आतच तेथून माल निर्यात करण्यास प्रारंभ झाला. आता निर्यात मालात हळूहळू वाढ होऊ लागेल.

---

## एकूण पुरवठ्यातील आयातीचा अंश किती कमी झाला?

### १९५०-५१ ते १९६४-६५ मधील प्रगती

| | एकूण पुरवठ्याशी आयातीचे प्रमाण % | | झालेल्या प्रगतीचे प्रमाण % |
|---|---|---|---|
| | १९५०-५१ | १९६४-६५ | |
| केरोसीन | ९३.९ | ३४.८ | ६२.९ |
| इतर पेट्रोलियम पदार्थ | ९१.५ | १.६ | ९८.३ |
| नैत्रयुक्त खते | ५९.३ | ४३.६ | ५१.२ |
| औषधे | ५१.९ | ५.८ | ८८.८ |
| रंग | १००.० | ३४.७ | ६५.३ |
| कॉस्टिक सोडा | ६६.७ | २६.२ | ६०.७ |
| सोडा अॅश | ३९.५ | १०.६ | ७३.२ |
| रेयॉन्स | १००.० | १३.६ | ८६.४ |
| प्लॅस्टिक्स | १००.० | २५.१ | ७४.९ |
| पेपर, पेपर बोर्ड | २३.२ | ४.६ | ८०.२ |
| अॅल्युमिनिअम | ७४.८ | २९.७ | ६०.३ |
| टेक्स्टाइल मशिनरी | १००.० | ५६.५ | ४३.५ |
| मशीन टूल्स | ८८.० | ४६.४ | ४७.३ |
| साखर माशिनरी | १००.० | ४.३ | ९६.७ |
| शिवणाची यंत्रे | ४२.१ | ...... | १००.० |
| टाइपरायटर्स | १००.० | ०.९ | ९९.१ |
| रेडिओ | २४.६ | ०.६ | ९७.६ |
| वाहतुकीची साधने | ३५.७ | ०.५ | ९८.६ |
| सायकली | ६२.४ | ...... | १००.० |

---

### सरकारी मालकीच्या औद्योगिक संघटना

भारत सरकारच्या उद्योग खात्याने सार्वजनिक मालकीच्या आठ प्रमुख औद्योगिक संघटनांची पाहणी केली आहे. पाहणीवरून असे दिसून आले की त्यापैकी बहुतेक संघटना ठरविण्यात आल्याप्रमाणे काम करू शकत नाहीत, अगर त्यांनी आपली उत्पादनाची उद्दिष्टेही गाठलेली नाहीत. ह्या परिस्थितीची अनेक कारणे नमूद करण्यात आली आहेत. कच्च्या मालाची आयात करण्यासाठी आणि सुटे भाग आयात करण्यासाठी लागणाऱ्या परदेशीय चलनाची टंचाई, प्रकल्पाची उभारणी करण्यात झालेला विलंब, कामगारांतील असंतोष, विजेच्या पुरवठ्यातील कपात, इत्यादी कारणांमुळे ह्या संघटनांचे कार्य जितक्या कार्यक्षमतेने व्हावयास पाहिजे होते तितके झाले नाही.

---

### क्रिकेटपटूचा विपन्नावस्थेत मृत्यू

भारताचा पूर्वीचा गोलंदाज गुलाम महमद हा कराची येथे वयाच्या ६५ व्या वर्षी प्रदीर्घ आजारानंतर २२ जुलै रोजी मृत्यू पावला. १९३२ साली भारताचा संघ इंग्लंडच्या दौऱ्यावर गेला होता, त्यात त्याचा समावेश झालेला होता. तो डाव्या हाताने, मध्यम गतीची गोलंदाजी करायचा, आणि उजव्या हाताने फलंदाजी करायचा. १९२४ साली आर्थर गिलिगनच्या नेतृत्वाखाली एम. सी. सी. चा संघ येथे आला होता, त्यात तो चमकला होता. अलिगड विद्यापीठाचा तो माजी विद्यार्थी होता. त्याच्या आयुष्याचा उत्तरार्ध विपन्नावस्थेत गेला. मिळेल ती कारकुनी करून आणि फूटपाथवर येणाऱ्या-जाणाऱ्यांची पत्रे टाइप करून तो आपला उदारनिर्वाह करीत असे.

---

## आयात–निर्यातीमधील प्रतिकूल तफावत

पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या मुदतीत भारताचा निर्यात व्यापार प्रतिवर्षी ६०६ कोटी रुपये किमतीचा, तर आयात व्यापार ७२३ कोटी रुपये किमतीचा होता. दुसऱ्या योजनेच्या काळातील हेच आकडे अनुक्रमे ६०९ कोटी रुपये आणि ९७६ कोटी रुपये होते. मात्र तिसऱ्या योजनेच्या मुदतीत निर्यातीत ठळक स्वरूपाची वाढ होऊन व्यापार प्रतिवर्षी सरासरी ७६२ कोटी रुपयांच्या घरात गेला परंतु आयात व्यापारही १,२२० कोटी रुपये किमतीचा झाला. पहिल्या योजनेच्या काळात भारताची प्रतिकूल व्यापारी तफावत प्रतिवर्षी सरासरी ११७·५ कोटी रुपये होती, तर दुसऱ्या योजनेच्या मुदतीत ती वाढून ३६७·२ कोटी रुपयांवर आणि तिसऱ्या योजनेत तर ती आणखी वाढून ४५८ कोटी रुपयांवर गेली. ही इतकी तफावत भरून काढण्यासाठी तसेच परकीय चलनात देणी अदा करण्यासाठीही निर्यात व्यापारात वाढ करणे आवश्यकच आहे.

विविध प्रकारच्या उपाय योजनांमुळे आपल्या निर्यात व्यापार वाढीस चांगलीच गती आली आहे. पहिल्या दोन पंचवार्षिक योजनांच्या मुदतीत आढळलेली मंदाई गेल्या पाच वर्षांत नाहीशी झाली आहे. तिसऱ्या योजनेच्या काळात निर्यात व्यापाराचे लक्ष्य ओलांडले गेले आहे. १९६४–६५ मध्ये ८१५ कोटी रुपये किमतीचा निर्यात व्यापार झाला. अभूतपूर्व अवर्षण आणि परिणामी शेतीच्या उत्पन्नातील घट झाली नसती तर १९६५–६६ मध्येही निर्यातवाढ आणखी झाली असती. शेती आघाडीवर पिछेहाट झाली तरीही १९६५–६६ मध्ये निर्यातीची पातळी जवळ जवळ त्यामागील वर्षाइतकी राहिली. तयार मालाच्या सुधारलेल्या निर्यातीमुळे हे घडू शकले.

निर्यात व्यापारात सुमारे ७५ टक्के माल शेतीपासून व तज्जन्य पदार्थांपासून तयार केलेला असतो. ही स्थिती अजून अनेक वर्षे राहील म्हणून शेतकी विकासास अग्रक्रम देण्यात येत आहे. शेतीच्या क्षेत्रात बऱ्याच प्रमाणात माल शिल्लक राहू लागेल तेव्हाच निर्यातवाढीच्या प्रयत्नास भरघोस यश मिळू शकेल. त्याचबरोबर औद्योगिक उत्पादन वाढीसाठीही निरनिराळे उपाय योजले पाहिजेत.

## अमेरिकेपेक्षाही श्रीमंत

दर माणशी राष्ट्रीय उत्पन्नाच्या हिशेबाने पाहता, कुवेत हा देश सबंध जगात पहिल्या अनुक्रमाचा आहे. तेथील दर माणशी उत्पन्न ८,७२३ रुपये आहे. अमेरिकेच्या नागरिकाचे उत्पन्न (८,६२५ रु.) त्याच्या खालोखाल येते. गेल्या युद्धापर्यंत कुवेत हा निर्धन वालुकामय प्रदेश होता. तेथील भूमीतील तेलामुळे त्याचे नशीब उघडले. तेल निर्गत करणाऱ्या देशांत कुवेतचा अनुक्रम पहिला आहे. ८० ते १०० वर्षांनी तेलाचा साठा संपल्यावर मात्र त्याची पंचाईत होईल. तेथील उद्योगधंद्यांतील २८,००० लोकांपैकी ९०% लोक परदेशीय आहेत. कुवेती मनुष्य सरकारी नोकरी पत्करतो. एकूण लोकसंख्या सुमारे ५ लक्ष आहे, त्यापैकी निम्मे लोक परदेशीय आहेत. आपल्या देशाचे कुवेती स्वरूप राखण्यासाठी परदेशीयांचे प्रमाण कमी करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. पण सध्याच्या कंपन्यांवर आणि नव्या उद्योगधंद्यांवर त्या धोरणाचा परिणाम होण्याची सरकारला भीती वाटते. नवे उद्योगधंदे काढण्यास खाजगी भांडवलदार पुढे येत नाहीत; विदेशी तज्ज्ञांचा सल्ला घेऊन कित्येक नवे उपक्रम हाती घेण्याचा सरकारचा विचार आहे. कुवेतमध्ये तयार माल फारसा खपण्याची शक्यता नाही आणि अरब देशांचे एकमेकाशी आर्थिक सहकार्यही घडून येणे कठीण आहे.

## टोकियो शहरातील विषारी हवेचा धोका

जपानमधील टोकियो हे शहर लोकसंख्येच्या दृष्टीने पहिल्या अनुक्रमाचे आहे. त्याची लोकसंख्या आता १ कोटी, १० लाखांच्या घरात गेलेली आहे. उद्योगधंद्याच्या केंद्रीकरणामुळे ह्या शहरातील वातावरण अधिकाधिक दूषित होत चालले आहे. शहरातील अनेक कारखानें आपल्या धुराड्यांतून धुराचे लोटच्या लोट हवेत सोडत असतात. त्यातच रस्त्यांवरून धावणाऱ्या मोटारगाड्यांतून सुटणाऱ्या विषारी वायूची भर पडत असते. अधूनमधून पडणाऱ्या धुक्याशी ह्या विखाराचा संयोग झाला की शहरातील हवा आरोग्याला आणखीच बाधक होते. प्रत्येक महिन्याला हवेतील हा विखार वाढत चाललेला आहे. शहरातील लोकांना गुदमरवून टाकणारे हे वातावरण नष्ट करण्यासाठी काहीतरी उपाय योजणे जरूर झाले आहे. जपानच्या बादशहाच्या राजवाड्याभोवती ४,४०० गगनचुंबी वृक्ष आहेत. पण त्यांच्या पर्णराजी हवेतील कोळशाच्या धूलीकणांमुळे निस्तेज होत चालली आहे. ह्यापैकी काही झाडे १०० वर्षांची जुनी आहेत. पण ती मृत्युपंथाला लागण्याची शक्यता दिसू लागली आहे. टोकियोमधील प्राणिसंग्रहालय हे त्या देशातील सर्वांत मोठे आहे. त्यातील प्राण्यांच्या जीवनावरही विषारी हवेचा विपरीत परिणाम होऊ लागला आहे. प्राण्यांपैकी पुष्कळसे प्राणी दूषित हवेमुळे बळी पडले आहेत. असल्या हवेला टिकून जिवंत राहण्याचे सामर्थ्य बहुतेक प्राण्यांना नसते. ह्याला अपवाद फक्त चिंपाझी वानराचा आहे. ह्या वानराच्या नाकात माणसासारखे केस उगवतात व त्यामुळे तो विषारी हवेपासून आपला बचाव करू शकतो. उद्योगधंद्यांच्या केंद्रीकरणाची ही व्यथा उद्बोधक म्हटली पाहिजे.

## अमेरिकेच्या धान्याच्या मदतीत कपात

चालू वर्षी अमेरिकेकडून परदेशांना देण्यात येणाऱ्या गव्हाच्या मदतीत २५ टक्के कपात करण्यात येण्याची शक्यता आहे. अर्थातच भारताला मिळावयाच्या गव्हातही कपात होण्याच्या संभव आहे. भारताशिवाय इतर अनेक देशांना अमेरिका मदतीदाखल गहू पाठविते. ह्या सर्वच देशांना गव्हात करण्यात येणाऱ्या संभाव्य कपातीची कल्पना देण्यात आली असून संबंधित देशांनी अन्नधान्याच्या मागण्या करताना अमेरिकेचे नवीन धोरण लक्षात घ्यावे अशा सूचना करण्यात आल्या आहेत. खुद्द अमेरिकेतही गव्हाप्रमाणेच दुधाची भुकटी, लोणी व इतर दुग्ध पदार्थ ह्यांची टंचाई होऊ लागली आहे. तथापि गव्हाची जागा भरून काढण्यासाठी इतर प्रकारच्या अन्नधान्याचा पुरवठा अमेरिका काही प्रमाणात करू शकेल. अमेरिका, कॅनडा, फ्रान्स, ऑस्ट्रेलिया व अर्जेंटिना ह्या देशांतील शिल्लक गव्हाचे साठे चालू वर्षी मागील वर्षाच्या तुलनेने कमी होतील असा अंदाज आहे.

**चित्रपटांची लांबी कमी करणार**—मद्रासमधील चित्रपटांच्या निर्मात्यांनी चित्रपटांची जास्तीत जास्त लांबी ४ हजार मीटरपेक्षा अधिक न ठेवण्याचा निर्णय एकमताने घेतला आहे. निर्मात्यांनी स्वतःवर घालून घेतलेल्या ह्या निर्बंधाने चित्रपटांचा उत्पादनखर्च कमी होईल. शिवाय कच्च्या फिल्मवर घेण्यात येणाऱ्या अबकारी कराच्या दरांतही त्यांना सवलत मिळेल.

**नर्मदा योजनेचा संरक्षणासाठी फायदा**—नर्मदा नदी योजना पूर्ण करण्यासाठी १,०५० कोटी रुपये खर्च येईल आणि ती पूर्ण होण्यास ३० वर्षे लागतील. गुजरात, मध्यप्रदेश व महाराष्ट्र राज्यांना तिचा फायदा मिळेलच. पण कच्छच्या रेताड प्रदेशाला पाणीपुरवठा करता आल्याने तेथील लोकवस्ती वाढेल आणि त्यामुळे संरक्षणालाही तिचा उपयोग होईल.

**पत्त्यांची आयात किती?**—लोकसभेतील एका सभासदाने भारतात ५२ लाख रुपयांचे खेळण्याचे पत्ते आयात करण्यात आले असे विधान केले होते. भारत सरकारच्या व्यापारखात्याने सभासदाला अशी माहिती दिली आहे की अशी आयात कोणत्याच रीतीने करण्यात आलेली नाही. पत्त्यांच्या आयातीवरील निर्बंध गेली कित्येक वर्षे चालू असून अलीकडील ५ वर्षांत ३४ हजार रुपयांचे बेकायदा आयात करण्यात आलेले पत्ते जप्त करण्यात आले आहेत.

**कर्तव्यनिष्ठेची कथा**—दिल्लीकडे येणाऱ्या एका स्थानिक आगगाडीतील उतारूंना रात्रीच्या वेळी तीन तास तिष्ठत बसावे लागले. दिल्लीपासून ५ मैलांवर आल्यावर ह्या गाडीच्या ड्रायव्हरचे कामाचे ८ तास संपले. त्याबरोबर त्याने गाडी थांबविली आणि सरळ घरचा रस्ता धरला. तीन तासांनंतर मागाहून येणाऱ्या दुसऱ्या आगगाडीने उतारू परतले.

**भारत-नेपाळ संयुक्त योजना**—नेपाळमधून भारतात वाहणाऱ्या शारदा नदीवर दोन्ही देशांनी मिळून एक धरण बांधण्याच्या योजनेचा विचार चालू आहे. संकल्पित योजना गंडक व कोसी नद्यांवरील धरण योजनेपेक्षाही मोठी आहे. योजना अमलात आणली गेल्यास १० लाख किलोवॅटपेक्षा अधिक वीज उत्पन्न करता येईल आणि वाराणसी व अलाहाबाद भागातील हजारो एकर जमीन ओलिताखाली येईल.

**देणग्या चेकने घेण्याची कल्पना**—येत्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी काँग्रेस पक्षाला देण्यात येणाऱ्या देणग्या रोखीने न घेता चेकनेच स्वीकारण्यात याव्यात अशी कल्पना मध्यप्रदेश काँग्रेस कमिटीपुढे आली आहे. ह्या पद्धतीमुळे हिशेब ठेवण्याच्या कटकटी कमी होतील आणि देणग्यांबद्दल संशयास्पद वातावरण निर्माण होणार नाही अशी अपेक्षा आहे.

**ब्रिटिश डॉक्टरांचे परदेशगमन**—ब्रिटनमधील डॉक्टर लोकांची संख्या वाढत जाण्याऐवजी कमी होऊ लागल्याचे आढळून आले आहे. ब्रिटनच्या आरोग्यमंत्र्यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे गेल्या एप्रिलच्या आरंभी डॉक्टरांची संख्या १९,९५० होती. गेल्या वर्षी ह्याच दिवशी त्यांची संख्या २१,२९७ होती. ब्रिटनमधील अनेक डॉक्टर्स अमेरिका, कॅनडा व ऑस्ट्रेलिया ह्या देशांतून मोठ्या पगाराच्या नोकऱ्या स्वीकारतात. ब्रिटनमधील राष्ट्रीय आरोग्य संघटनेचे पगार त्यांना तुटपुंजे वाटतात.




BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES
Make doubly sure by fitting



GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA

MANUFACTURERS OF MACHINE SPARE PARTS & TOOLS

श्री. वा. काळे ह्यांची
कौटुंबिक व सामाजिक जीवनावरील पुस्तके
१ कण आणि क्षण, २ पुढे पाऊल,
३ तुमचे स्थान कोणते ?

## चीनचा ब्रह्मपुत्रा नदीवरील महत्त्वाचा पूल

१९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले, तेव्हापासून तिबेटमधील दळणवळणाचे मार्ग सुधारण्याचे काम चीनने चालूच ठेवले आहे. ब्रह्मपुत्रा नदीच्या उगमाजवळील भागात चीनने एक नवा पूल बांधला आहे. हा पूल ल्हासाच्या नैर्ऋत्येला आहे. ब्रह्मपुत्रा नदीच्या ह्या भागाचे चिनी नाव सांगपो असे आहे. चुशुल ह्या ठिकाणी बांधलेला हा पूल नुकताच वाहतुकीस खुला करण्यात आला आहे. १९६२ च्या रणसंग्रामात प्रसिद्ध पावलेले चुशुल मात्र हे नव्हे. नव्या पुलामुळे ल्हासा आणि ग्यांटसे ह्यांच्यांत सरळ वाहतूक होऊ शकेल. चीनचा तिबेटवरील ताबा बळकट करण्याच्या दृष्टीने नव्या पुलाला महत्त्व आहेच. पण भारताच्या दृष्टीने त्याला विशेष लष्करी महत्त्व आहे. कारण, भारताच्या सरहद्दीवर सतत उभ्या ठाकलेल्या चीनच्या लष्कराला रसद पुरविण्याचे काम चीनला पुलामुळे सुलभ होणार आहे.

---

## कोचीन येथील तेलशुद्धीचा कारखाना


सार्वजनिक मालकीच्या विभागात स्थापन करण्यात येत असलेला कोचीन येथील तेलशुद्धीचा कारखाना पुढील महिन्यापासून उत्पादन करू लागेल. देशाला लागणाऱ्या डिझेल तेलाच्या पुरवठ्याबाबत स्वयंपूर्ण होण्याच्या कामी त्यामुळे खूपच मदत होणार आहे.गेल्या सहा महिन्यांतील भारतामधील डिझेल तेलाचा मासिक सरासरी खप २ लाख, २५ हजार टन आहे. देशातील तेलशुद्धीच्या कारखान्यांतून दरमहा २ लाख टनांपर्यंत डिझेल तेलाचे उत्पादन होते. पुरवठा आणि उत्पादन ह्यांच्या दरम्यान असलेली ही तफावत कोचीन येथील कारखाना सुरू झाल्यावर भरून निघू शकेल. तीच गोष्ट रॉकेल तेलाची. देशातील रॉकेल तेलाची मासिक सरासरी गरज २ लाख, १० हजार टन आहे. उत्पादन मात्र १ लाख, ३५ हजार टन आहे. कोचीनमधील कारखाना हा फरक नाहीसा करू शकेल. १९७० पासून रॉकेल तेलाची आयात बंद करता येण्यासारखी परिस्थिती उत्पन्न होईल.

---

## चौथ्या कार्यक्रमातील शेतीवरील खर्च

हिंदी रुपयाचे अवमूल्यन झाल्यानंतरच्या परिस्थितीचा विचार करून नियोजन समितीने चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमात करण्यात येणाऱ्या शेतीवरील खर्चाचा फेरविचार केला आहे. आता शेतीच्या विकासासाठी २,४९० कोटी रुपयांची रक्कम खर्च करण्यात यावयाची आहे. कार्यक्रमांचा जो ताजा तर्जुमा करण्यात आला होता, त्यात २,३७२ कोटी रुपये खर्चाची तरतूद करण्यात आली होती. म्हणजे नव्याने ठरविण्यात आलेल्या खर्चाचा आकडा ११८ कोटी रुपयांनी अधिक आहे. भारताच्या रुपयाचे अवमूल्यन करण्यात आल्याने शेतीच्या विकासासाठी करण्यात यावयाच्या खर्चात ६० कोटी रुपयांची वाढ झालेली आहे. ५० कोटी रुपयांची रक्कम मुद्दामच अधिक वाढविण्यात आली आहे. त्यातून जादा पिके देणाऱ्या संकरित बी–बियाणांचा खर्च व व्यापारी पिकांच्या विकासाचा खर्च भागविण्यात येणार आहे.

---





दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.
मुख्य कचेरी: सातारा (महाराष्ट्र)


हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.